Reading Comprehension

# माझे पोट

एक दिवस माझे पोट बोलू लागले. " तुला पिझ्झा आवडतो. चिप्स आवडतात. लाडू, गुलाबजाम आणि खीर हे तुला खायला आवडते.

पण तू खूप खाऊ नकोस. कारण मग मला फार काम करावे लागते.

मी दमतो. ढेकर देऊन मी तुला सूचना देतो. पण तू ऐकत नाहीस. " नंतर एक दिवस माझे पोट खूप दुखले. मी रडलो. मला पोटाचे सांगणे पटले.

प्रश्न:

१. एक दिवस माझ्याशी कोण बोलू लागले?

२. मला काय काय खायला आवडते?

३. पोटाचे काय सांगणे होते?

४. पोट कशी सूचना देते?

५. आवडत्या गोष्टी खूप खाल्ल्या तर काय होते?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Reading Comprehension

# नारळाचे झाड

हे बघ नारळाचे झाड. झाड खूप उंच आहे. एका झाडाला खूप नारळ लागतात. झाडाची पाने खूप मोठी असतात. झाडावर चढणे कठीण असते. माणसे या उंच झाडावर चढून नारळ काढतात. नारळ पूजेसाठी आणि जेवणात वापरतात. नारळातील पाणी खूप गोड असते. नारळाच्या झाडाचे अनेक उपयोग आहेत. या झाडाची पाने सुकली की त्यापासून  झाडू बनवतात. तसेच या पानांचे झोपडीवर छप्पर बनवतात.

प्रश्न

१. नारळाचे झाड कसे असते?

२. झाडावरचे नारळ कसे काढतात?

३. नारळाचे पाणी कसे असते?

४. नारळ कशासाठी वापरतात ?

५. सुकलेल्या पानांचे काय बनते?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Listening Comprehension

# आमचे आजोबा

आमचे आजोबा खूपच गोष्टी विसरतात. एकदा ते फिरायला गेले आणि परत येताना त्यांना घरचा रस्ता आठवेना. म्हणूनच ते बाहेर गेले की मला त्यांची काळजी वाटते. ते जेवायला बसले की दाताची कवळी (denture) घालायला विसरतात. औषध घ्यायला विसरतात. कधीकधी ते माझे नावच विसरतात. एकदा ते त्यांचा चष्मा शोधत होते. घरभर हिंडले पण चष्मा काही सापडेना. मग मी त्यांना तो शोधून दिला कारण तो त्यांच्या कपाळावरच होता.

प्रश्न

१.आजोबा फिरायला गेले की काय होते ?

२.मला त्यांची काळजी कधी वाटते?

३.आजोबा अजून काय काय विसरतात?

४.एकदा आजोबा काय शोधत होते?

५. मला आजोबांची वस्तू कशी सापडली?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Listening Comprehension

# भांडण

एकदा आरव आणि रुना आईबरोबर बाजारात गेले. तिथे त्यांनी आईकडे फुगे घे असा हट्ट केला. आईने दोन फुगे घेऊन दिले. आईने आरवला लाल फुगा दिला. रुनाला हिरवा फुगा दिला. पण रुनाला लालच फुगा हवा होता. मग दोघांचे भांडण सुरू झाले. फुगे हातातून सुटले. वरवर जाऊ लागले. आरवने वर बघितले. रुनाने वर बघितले. फुगे खूप उंच निघून गेले. आई म्हणाली, “बघा, भांडण केले की असे होते. "

प्रश्न

१. आरव आणि रुना कुठे गेले होते?

२. त्यांनी आईकडे कशासाठी हट्ट केला?

३. आईने कोणत्या रंगाचे फुगे घेतले?

४. आरव आणि रुना मध्ये भांडण का झाले?

५. भांडणामुळे काय होते?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.